# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
## छत्रपती संभाजीनगर

## सामान्य प्रशासन विभाग
## परिपत्रक/२०२५

---

या परिपत्रकाद्वारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाशी संलग्नित सर्व संस्था, महाविद्यालये यांना कळविण्यात येते की, विद्यापीठाच्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून उत्कृष्ट महाविद्यालयाची निवड करून त्यासाठी स्वर्गीय शिक्षक आमदार श्री. वसंतराव काळे यांच्या नावाने "स्वर्गीय शिक्षक आमदार वसंतराव काळे उत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार" सुरु करण्यास अधिसभेच्या दि. ३०-११-२०२४ च्या बैठकीत ठराव क्र. १८ अन्वये मान्यता देण्यात आली आहे.

सदर पुरस्कार दरवर्षी एक अनुदानित आणि एक विनाअनुदानित अशा एकूण ०२ महाविद्यालयांस दिला जाणार आहे.

पुरस्कारासंदर्भात नियमावली आणि विहित अर्जाचा नमुना PDF आणि MS-Word स्वरुपात www.bamu.ac.in ह्या विद्यापीठ संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आला आहे.

भरलेल्या अर्जाची Hardcopy विद्यापीठाच्या कुलसचिव कार्यालयात जमा करण्याची अंतिम मुदत दिनांक १८-०७-२०२५ अशी राहील.

करिता, सर्व इच्छुक संस्था, महाविद्यालयांनी याची नोंद घ्यावी.

**विद्यापीठ प्रांगण,** )(
छत्रपती संभाजीनगर- ४३१ ००४ )(
संदर्भ :- सा.प्र./२०२५/202 )(
दिनांक :- ०३-०७-२०२५ )(

**कुलसचिव**

या परिपत्रकाची प्रत:-

१) संस्थेचे अध्यक्ष/ सचिव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाशी संलग्नित सर्व संस्था

२) महाविद्यालयांचे प्राचार्य, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालये.

३) जनसंपर्क अधिकारी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर.

४) संचालक, युनिक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांना देऊन कळविण्यात येते की, सदरील परिपत्रक, पुरस्काराची नियमावली आणि विहित अर्जाची लिंक विद्यापीठ संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात यावी.